# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२-२९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. ५५-२२** **दिनांक १९/०२/२०२२**

**रिक्षा चोरी करणा-या टोळीकडुन चोरीच्या तब्बल १० ऑटोरिक्षा हस्तगत-गुन्हे शाखा कक्ष-२ वसई यांची कामगिरी.**

तक्रारदार श्री. हरिशंकर विक्रम पाल, धंदा- रिक्षाचालक रा. रमेश मोर्या चाळ, जीवननगर, गावराईपाडा, वसई पुर्व, ता. वसई जि. पालघर यांची बजाज कंपनीची रिक्षा क्रं. एम.एच. ४७. डी ३५४२ हि दिनांक दिनांक २५/१०/२०२१ रोजी रात्रौ ११.०० वा. ते दि. २६/१०/२०२१ रोजी सकाळी ०७.३० वा.चे सुमारास रमेश मोर्या चाळ, जीवननगर, गावराईपाडा, वसई पुर्व, ता. वसई जि. पालघर येथुन चोरीस गेली असल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन वालीव पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १२४७/२०२१ भा.दं.वि.स. कलम ३७९ प्रमाणे दिनांक ०१/११/२०२१ गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदार यांनी तपास करुन गुप्त बातमीदाराकरवी माहिती प्राप्त करुन नमुद गुन्हयातील संशईतांची नावे निष्पन्न करुन आरोपीत नामे १) मोनु अभिमन्यु पांडे वय २४ वर्ष रा. रुम नं ९, आशानगर, गावदेवी मंदिराचे बाजूला, चिंचोटी ब्रिजचे पुढे, मुंबई अहमदाबाद हायवे शेजारी मुळ गाव- मदारपुर, पो- संगमपुर, ता. सैदपुर, जिल्हा- गाझीपुर, राज्य उत्तरप्रदेश २) प्रवेशकुमार चंद्रेशकुमार शुक्ला वय २८ वर्ष रा. रुस्तम कंपाऊंड, सर्वे नं ४८, लोहार पाडा, शिवमंदिराचे बाजुला, चिंचोटी, वसई पुर्व, ता. वसई मुळ रा. तुलापुर, पो- महराजगंज, ता- ग्यानपुर, जि-भदोही, राज्य उत्तरप्रदेश ३) संजयकुमार रामआचल गौतम वय २४ वर्ष रा. रुस्तम कंपाऊंड, सर्वे नं ४८, लोहार पाडा, शिवमंदिराचे बाजुला,चिंचोटी, वसई पुर्व, ता. वसई मुळ रा. बडागाव, पो- सरायमोहदी, ता- शहागंज, जि- जौनपुर, राज्य उत्तरप्रदेश यांना ताब्यात घेवून नमुद आरोपीत यांचेकडुन खालील तक्त्यानुसार १० गुन्हे उघडकीस आणलेले आहेत.

| क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं |
|---|---|---|
| १) | **वालीव पोलीस ठाणे** | गुन्हा रजि नं १४६९/२०२१ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| २) | **वालीव पोलीस ठाणे** | गुन्हा रजि नं ९८३/२०२१ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ३) | **वालीव पोलीस ठाणे** | गुन्हा रजि नं ९११/२०२१ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ४) | **वालीव पोलीस ठाणे** | गुन्हा रजि नं १४५/२०२२ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ५) | **वालीव पोलीस ठाणे** | गुन्हा रजि नं ८११/२०२१ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ६) | **वालीव पोलीस ठाणे** | गुन्हा रजि नं १२४७/२०२१ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ७) | **तुळींज पोलीस ठाणे** | गुन्हा रजि नं २५१/२०२१ भादविस कलम ३७९ प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| ८) | **काशिमिरा पोलीस ठाणे** | गुन्हा रजि नं ८८/२०२२ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ९) | **वर्तकनगर ठाणे पोलीस ठाणे** | गुन्हा रजि नं ३८५/२०२१ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| १०) | **वर्तकनगर ठाणे पोलीस ठाणे** | गुन्हा रजि नं ३७७/२०२१ भादविस कलम ३७९ प्रमाणे |

वरीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आणले असुन सदर गुन्हयात चोरीस गेलेल्या १० ऑटोरिक्षा निवेदन पंचनाम्याव्दारे आणि आरोपीत यांचेकडून ११ डिस्कसहीत टायर आणि २ ऑटोरीक्षाच्या बॅट-या असा एकुण ०५,०८,०५०/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सपोनि रणजितसिंग परदेशी, सपोनि. सुहास कांबळे, सपोनि. ज्ञानेश्वर जगताप, पो.हवा. मंगेश चव्हाण, रमेश भोसले, संजय नवले, महेश पागधरे, चंदन मोरे, सचिन पाटील, पोना. प्रशांतकुमार ठाकुर, प्रशांत पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, पो.कॉ. अमोल कोरे, दादा आडके, सुधीर नरळे यांनी केली आहे.

